महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

महाराष्ट्रातील जिल्हा, तालुका तसेच गाव पातळीवर प्रतिनिधी होण्याची सुवर्णसंधी!
पत्रकारीता करू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी संपर्क साधावा.
✲ संपादक ✲
मो. क्र. ९५४५९ १०१७७ व ९२७२४ ५३९२१

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष – ११ वे ■ अंक क्र. –१६० ■ बुधवार दि. ८ जानेवारी २०२५ ■ किंमत – १ रूपया ■ पाने – ४

## तलाठ्याला तीन हजार रुपये लाच घेताना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने पकडले

**दै. आवाज वृत्तसेवा...**
**जळगाव/प्रतिनिधी :–** तालुक्यातील कुसुंबा येथे सातबारा उतार्यावर आई व भावाचे नाव लावण्यासाठी पाच हजार रुपयांची लाच तलाठ्याने मागितली होती. तडजोडीअंती तलाठ्याला तीन हजार रुपये लाच घेताना जळगाव लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने तलाठ्यास रंगेहाथ अटक केली आहे.

तक्रारदार यांनी त्यांचे आई व भावाचे नाव सातबारा उतार्यावर व स्लॅब रजिस्टरवर नाव लावण्यासाठी अर्ज केला होता. त्याबाबत तलाठी नितीन शेषराव भोई (वय ३१ वर्षे) यांनी ५ हजार रुपये लाचेची मागणी केली होती. त्याबाबत तक्रारदार यांनी दि.७ जानेवारी रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जळगाव यांना तक्रार दिली होती. सदर तक्रारीची पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता तलाठी नितीन भोई यांनी सातबारा उतार्यावर व स्लॅब रजिस्टरवर नाव लावण्यासाठी प्रथम ५ हजार, नंतर ४ हजार रुपये व तडजोडअंती ३ हजार रुपयाची लाचेची मागणी केली.

यावेळी तलाठी नितीन भोई दि.७ जानेवारी रोजी ३ हजार रुपये लाचेची रक्कम स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस उपअधीक्षक योगेश ठाकूर, पोलीस निरीक्षक स्मिता नवघरे, फौजदार सुरेश पाटील, पोना बाळू मराठे, पोकॉ अमोल सूर्यवंशी यांनी केली आहे.

## गोदावरी कालव्यातून तीन आवर्तने सोडण्यात येतील – जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे



**दै. आवाज वृत्तसेवा...**
**शिर्डी/प्रतिनिधी :–** गोदावरी खोऱ्यात डावा व उजवा कालवा खोऱ्यात तीन आवर्तने सोडण्यात येतील. अतिरिक्त पाणी बचत झाल्यास चौथे आवर्तन सोडण्याचा विचार करण्यात येईल, अशी माहिती राज्याचे जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

राहाता येथे झालेल्या गोदावरी डावा व उजवा कालवे सल्लागार समितीच्या बैठकीत अध्यक्षपदावरून ते बोलत होते. याप्रसंगी खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार आशुतोष काळे, आमदार हेमंत ओगले, माजी आमदार स्नेहलता कोल्हे, समितीचे सदस्य तसेच शिर्डी उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, नाशिक विभाग मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ, अधीक्षक अभियंता राजेश गोवर्धने, कार्यकारी अभियंता सोनल शहाणे, आदी उपस्थित होते.

जलसंपदा मंत्री श्री. विखे पाटील म्हणाले की, शेतकऱ्यांनी पाण्याची बचत करून अधिकचे पाणी शेतीला कसे उपलब्ध होईल यासाठी प्रयत्न करावेत, गोदावरी उजव्या कालवा नूतनीकरणासाठी १९१ कोटींची मान्यता शासनाने दिली आहे. डावा व उजवा कालव्याच्या चारी दुरुस्ती करिता २६० कोटींचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. त्यास मान्यता देण्यात येईल. साधारणतः ४५० कोटी फक्त गोदावरी खोऱ्यावर शासन खर्च करणार आहे. पश्चिम वाहिनीनदीचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याच्या सर्वेक्षणासाठी ६५ कोटी मंजूर करण्यात आले आहेत. गोदावरी खोऱ्यात नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून अतिरिक्त पाणी वळविणे हे जलसंपदा विभागाचे सर्वोच्च प्राधान्य आहे. सर्वांना समप्रमाणात पाणी मिळावी ही शासनाची भूमिका असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. (पान ४ वर)

## देवमामलेदार स्मारकाचे काम पूर्ण नसतांनाही ठेकेदाराला १७ लाख रुपये अदा?



**दै. आवाज वृत्तसेवा...**
**तुषार रौंदळ, सटाणा –:** बागलाणचे आराध्य दैवत देवमामलेदार यशवंतराव महाराज यांच्या स्मारकाचे काम तीन वर्षे उलटूनही अपूर्णावस्थेत आहे. कुठलेही काम झाले नसताना ठेकेदाराला सतरा लाख रुपये अदाही करण्यात आले आहेत.

महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते तीन फेब्रुवारी २०२१ रोजी तत्कालीन लोकनियुक्त नगराध्यक्ष सुनिल मोरे यांनी या स्मारकाच्या कामाचे पूजन केले. मात्र तीन वर्षे उलटूनही स्मारकाच्या कामाला मुहूर्त सापडलेला नाही. राज्यशासनाच्या पर्यटन विभागाकडून जानेवारी २०१९ मध्ये ३ कोटी ८० लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली. यानंतर सटाणा नगर परिषदेने ऑगस्ट २०२० मध्ये स्मारकाच्या कामाची १ कोटी ५९ लाख रुपयांची निविदा काढली व हे काम नोव्हेंबर २०२० मध्ये इशिता इन्फ्रास्ट्रक्चर चोपडा यांना देण्यात आले. कामाची मुदत बारा महिने ठरवुन देण्यात आली परंतु वेळेत काम पूर्ण न केल्याने ह्या कंपनीला ८७९०० रुपये दंड करत कामाची मुदत मार्च २०२५ पर्यंत वाढवून देण्यात आली आहे. प्रत्यक्षात कुठलेही काम पूर्ण झालेले दिसत नाही तरी देखील संबधित कंपनीला सतरा लाख रुपये अदा करण्यात आले आहेत. २०२०पासून स्मारकाच्या ठिकाणी फक्त कौल रंगवणे, कौल काढणे, कौल लावणे, जुन्या दांड्या काढणे, लावणे हेच काम सुरू असल्याने स्मारकाचे नक्की काय काम सुरू आहे हे कोणालाही कळत नसल्याचे भाविक बोलत आहेत आताच्या परिस्थितीपेक्षा आधीचेच स्मारक सुंदर होते ज्यावेळी राज्यपालांनी पूजन केले त्यावेळी असलेले स्मारक तसेच राहिले असते तरी भाविकांनी आनंदाने स्वीकारले असते. कामाच्या नावाने स्मारकाची अवस्था बिघडत असल्याचे भाविक बोलू लागले आहेत. समारकाचे काम कधी पूर्ण होईल व दर्शनासाठी कधी खुले होईल यांची भाविकांना आस लागली असुन अजून किती वर्ष प्रतीक्षा करावी लागते असा प्रश्न भक्तांच्या मनात उपस्थित होत आहे.

## केंद्रीय निधीचा उपयोग करून राज्यातील आरोग्य यंत्रणा सक्षम करावी – केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव



**दै. आवाज वृत्तसेवा...**
**मुंबई/प्रतिनिधी –:** केंद्र शासन आरोग्य व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी विविध योजना राबवित असते. यासाठी कार्यक्रम कृती आराखडा (पीआयपी) अंतर्गत निधी राज्याला देत असतो. या निधीचा उपयोग करून राज्यातील आरोग्य यंत्रणा सक्षम करावी, असे निर्देश केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार) तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिले.

आरोग्य भवन येथे आयोजित बैठकीत आरोग्य, आयुष आणि वैद्यकीय शिक्षण संबंधात राबविण्यात येत असलेल्या केंद्र शासनाच्या योजनांचा आढावा घेण्यात आला. बैठकीस आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर उपस्थित होते.

केंद्रीय राज्यमंत्री श्री. जाधव म्हणाले, केंद्र व राज्य यांच्या समन्वयातून योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी. आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा जास्तीत जास्त लाभ पात्र नागरिकांना देण्यात यावा. या योजनेच्या माध्यमातून ७० वर्ष व त्यावरील वृद्धांना राज्याचे महात्मा फुले जन आरोग्य अभियान व केंद्राच्या योजनेतून दहा लाख रुपयांपर्यंत वार्षिक उपचारांचा लाभ देण्यात येत आहे. आरोग्य क्षेत्रात पायाभूत सोयी सुविधांच्या कामांना अधिक गती देऊन ती वेळेत पूर्ण करावी, असे निर्देशही बैठकीत विभागांना देण्यात आले.

केंद्र सरकारने २०२५ मध्ये देश क्षयरोगमुक्त करण्याचे ठरविले आहे. यामध्ये १०० दिवसांचे क्षयरोगमुक्त भारत अभियान राबविण्यात येत आहे. क्षयरोग मुक्त अभियान यशस्वी करण्यासाठी नि:क्षय मित्र जास्तीत जास्त जोडण्यात यावेत. दत्तक रुग्णांना नियमित फूड बास्केटचे वितरण करावे. देशात ' देश का प्रकृती परीक्षण ' अभियान राबविण्यात आले आहे. या अभियानातून नागरिकांचे प्रकृती परीक्षण करण्यात आले आहे. याबाबत जनजागृती करावी व नियमित स्तरावर राबविण्यात यावेत. केंद्रीय आरोग्य निधी योजनेअंतर्गत १५ लाख रुपयापर्यंत उपचारासाठी दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना मदत करण्यात येते. या योजनेचा प्रचार व प्रसार करावा, अशा सूचनाही केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री श्री. जाधव यांनी दिल्या. बैठकीत सार्वजनिक आरोग्य विभाग, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आयुष विभागाकडील योजना आणि नवीन रुग्णालय निर्मिती, वैद्यकीय शिक्षण विभाग, प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

## पुणे येथे बीपीओत काम करणाऱ्या महिलेची हत्या

**दै. आवाज वृत्तसेवा...**
**पुणे/प्रतिनिधी –:** पुण्यातील बीपीओमध्ये काम करणाऱ्या महिलेवर तिच्या पुरुष सहकाऱ्याने चाकूने हल्ला केला. या घटनेत महिलेचा मृत्यू झाला आहे. या घटनेबाबत पोलिसांनी सांगितले की, कर्ज घेण्याच्या वादातून हा हल्ला झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार महाराष्ट्रातील पुण्यात एक हृदयद्रावक घटना घडली आहे. पुण्यातील बिझनेस प्रोसेस आउटसोर्सिंग बीपीओ कंपनीत काम करणाऱ्या २८ वर्षीय महिलेची मंगळवारी संध्याकाळी हत्या करण्यात आली. तसेच तिच्या पुरुष सहकाऱ्याने तिच्यावर धारदार शस्त्राने वार करून तिची हत्या केली. माहिती देताना पोलिसांनी सांगितले की, शहरातील येरवडा भागात असलेल्या WNS कंपनीच्या पार्किंगमध्ये हा हल्ला झाला. शुभदा कोदरे असे पीडितेचे नाव असून, कृष्णा कनोजा असे आरोपीचे नाव आहे. आरोपी कंपनीच्या अकाउंटिंग विभागात काम करायचा. तसेच पैसे उधार घेण्याच्या वादातून हा हल्ला झाल्याचे समजले आहे. त्यांनी सांगितले की, महिलेला मोठ्या प्रमाणात रक्तस्राव होत होता आणि तिला जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले, पण उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. शुभदाच्या बहिणीच्या तक्रारीवरून कनोजाला ताब्यात घेण्यात आले आणि भारतीय न्याय संहिता (बीएनएस) आणि शस्त्रास्त्र कायद्याच्या संबंधित कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

## सर्व वाहनांसाठी फास्ट टॅग अनिवार्य

**मुंबई/प्रतिनिधी–:** राज्यातील चार चाकी वाहन धारकांना एक एप्रिलपासून फास्ट टॅग अनिवार्य करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेतल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. १ एप्रिल २०२५ पासून या निर्णयाची अंमलबजावणी होईल. या निर्णयामुळे वाहतूक कोंडी टळून इंधनाची आणि वेळेची देखील बचत होणार आहे. फास्ट टॅग कार्यरत नसेल तर वाहन धारकाला पथकर शुल्काच्या दुप्पट शुल्क भरावे लागेल. त्याचप्रमाणे रोख रक्कम, स्मार्ट कार्ड, क्रेडिट, डेबिट कार्ड किंवा कोड किंवा इतर कोणत्याही माध्यमाद्वारे पथकर शुल्क भरायचे असेल तरी देखील दुप्पट पथकर शुल्क भरावे लागेल. एमएसआरडीसीच्या अखत्यारीत ५० टोलनाके असून सार्वजनिक बांधकाम विभागाचे राज्यात २३ टोल नाके आहेत. या नाक्यांवर या निर्णयाची अंमलबजावणी केली जाईल, अशी माहितीही उपमुख्यमंत्र्यांनी दिली.

महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव
आवाज
संपादक : भगवान सोनवणे
आपला व्यवसाय वृध्दिंगत होण्यासाठी दैनिक आवाजमध्ये जाहिरात करण्याची सुवर्णसंधी!
एक महिना – १४९९/– रु.
तीन महिने – २४९९/– रु.
सहा महिने – ५४९९/– रु.
✲ संपादक ✲
मो. क्र. ९५४५९ १०१७७ व ९२७२४ ५३९२१

# मराठी अभिजात भाषा चला ज्ञानभाषा करूया उपक्रमाचा शुभारंभ

## महाराष्ट्रातील मराठी भाषाप्रेमींना पत्रकार दिनी आवाहन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**मुंबई –** अभिजात भाषेचा दर्जा मिळणं ही अभिमानाची गोष्ट आहे, पण हा मिळा-लेला दर्जा टिकविण्यासाठी प्रयत्न करणं त्याहून महत्त्वाचं ठरणार आहे. दोन हजार वर्षांहून अधिक काळाची समृद्ध साहित्यिक परंपरा असलेली मराठी भाषा आणि तिचे साहित्य आपल्या पुढच्या पिढींपर्यंत टिकवून ठेवणे ही आपली प्रत्येकाची जबाबदारी झालेली आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला परंतु खऱ्या अर्थाने ती आज अभिजात राहिली आहे का ? यापुढे ती ज्ञानभाषा होण्यासाठी सर्व क्षेत्रा-तील मराठी भाषिकांनी प्रयत्न करावेत असे आवाहन मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे यांनी केले आहे.



मराठी भाषा संवर्धन पंधरवडा आणि दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार दिन दादरमध्ये काशिनाथ धुरू हॉल ट्रस्ट आणि दादर सार्वजनिक वाचनालय आणि मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई यांच्या वतीने साजरा करण्यात आला याप्रसंगी मालुसरे बोलत होते. वाचन संकल्प महाराष्ट्राचा या विषयावर चर्चा सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी दासावाचे कार्यवाह यतिन कामथे, कार्याध्यक्ष मनोहर साळवी, संघाचे माजी अध्यक्ष विजय ना कदम, कार्याध्यक्ष रमेश सांगळे, कार्यवाह नितीन कदम, कोषाध्यक्ष आत्माराम गायकवाड, माजी कार्याध्यक्ष नारायण परब, माजी कार्याध्यक्ष दिगंबर चव्हाण, कार्यक्रम – उपक्रम प्रमुख सुनील कुवरे, स्पर्धा प्रमुख दिलीप ल सावंत, निवृत्त मराठी भाषा संचालक परशुराम पाटील, दादर सार्वजनिक वाचनालयाच्या ग्रंथपाल सौ अश्विनी फाटक, सहाय्यक ग्रंथपाल पल्लवी वैद्य, वरिष्ठ ग्रंथपाल सौ अक्षरी सरवणकर व इतर सेवकवर्ग उप-स्थित होते.

मालुसरे पुढे असेही म्हणाले की, अमृततुल्य, संतांची, ज्ञानवंतांची, कीर्तिवंतांची, शूरांची, वीरांची, विजिगीषू अशी आपली मराठी मायभाषा! या आपल्या अमृततुल्य मराठी भाषेस अभिजात भाषेचा बहुमान मिळणे हे सर्वच मराठीप्रेमींचे स्वप्न होते. यासाठी सर्वांनीच गेली बारा वर्षे सातत्याने प्रयत्न केले, केंद्राकडे पाठपुरावा केला. अखेर मराठी भाषेचा सन्मान होऊन ती जगाच्या पाठीवर जाण्यासाठी सज्ज झाली आहे. मराठी ज्ञानभाषा होण्यासाठी केंद्र सरकारकडे राज्यसरकारने पाठपुरावा करण्यासाठी काय मुद्दे घेऊन पाठपुरावा करावा यासाठी महाराष्ट्रातील ज्येष्ठ साहित्यिक, प्राध्यापक, दिवाळी अंक – मासिकांचे संपादक, ज्येष्ठ पत्रकार, मराठी नाट्य-चित्रपट कलावंत, मराठी भाषा प्रेमी, अभ्यासक यांच्याकडून सूचना मागविण्यासाठी आवाहन पत्र तयार करण्यात आले.

दिनांक ६ जानेवारी पत्रकार दिन ते २७ फेब्रुवारी २०२५ या काळात हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. भारत सांस्कृतिक कार्य मंत्रालयाकडून अभिजात मराठी भाषेचा शासन निर्णय अद्याप महाराष्ट्र शासनाकडे आलेला नाही असे समजते, त्याची तातडीने पूर्तता व्हावी अशी मागणी करण्यात आली. मान्यवरांकडून लेटरहेडवर आलेल्या सर्व सुचनांचा दस्-तऐवज तयार करून तो राज्य सरकारकडे पाठविण्याचे यावेळी एकमताने ठरले. अधिक माहितीसाठी ९३२३११७७०४ या मोबाईलवर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.

# दोन राज्यस्तरीय पुरस्काराची मानकरी ठरणार परिसस्पर्श कादंबरी

**दै. आवाज वृत्तसेवा...**



**प्रा. डी. टी. पाटील बल्लकसर पिंपळनेर ता. साक्री, जि. धुळे –** गावकुसाचे लेखक कवी पत्रकार संपादक गावगाडाकार साहेबराव नंदन तात्या लिखित, ज्ञानसिंधु प्रकाशन नाशिक प्रकाशित, मुक्तेय निर्मित सौ. पुष्पलता उर्फ आक्का सो. संभाजीराव पगारे. पिं-पळनेर यांच्या जिवनावर आधारीत, बहुआयामी, बहुविध प्रासंगिक विषयांची एकाच माळेत गुंफन केलेली, वास्तव-तली नाइकेच्या भाळीच्या गोंदणाच्या परिसस्पर्शाने तिचा जीवनाचे सोने झाले. ग्रामिण बाजाची, मनोवेधक रंजक ! कुठे आसू तर कुठे हासू. भाव भावनांचा संमिश्र मेळ, अशी ही खांदेश विभागातून निर्मित झालेली ग्रामिण कांदबरी परिसस्पर्श सध्या सर्वत्र चर्चेचा विषय ठरला आहे. नुकताच या कादंबरीला माणूसकी मल्टीपर्पज फाऊंडेशन मलकापूर जि. बुलडाणा यांचा राज्यस्तरीय निळूभाऊ फुले साहित्य गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. आता ११ जानेवारी २०२५ रोजी गिरणा गौरव प्रतिष्ठानचा बहुचर्चित मानाचा तुरा खोवला जाणारा, राज्यस्तरीय निळूभाऊ फुले साहित्य वाङ्‌मय पुरस्कार नाशिक येथील शेकोटी साहित्य संमेलनात मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे. एकाच महिन्यात दोन राज्यस्तरीय पुरस्कारांची मानकरी ठरलेली परिसस्पर्श कांदबरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. लेखक साहेबराव नंदन तात्या यांचे भरभरून अभिनंदन होत असुन त्यांच्या पुढील साहित्य निर्मितीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# महाराष्ट्रातील ६० संपादकांना स्पीड पोष्टने सन्मानपत्र पाठवून जनजागृती सेवा संस्थेने साजरा केला पत्रकार दिन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**मुंबई –** बदलापूर(गुरुनाथ तिरपणकर) दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या दर्पण या वृत्तपत्राच्या स्मृती प्रित्यर्थ६जानेवारी हा दिवस महाराष्ट्रात पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो.जनजागृती सेवा संस्था ही पत्रकारांचा सन्मान करत असते.त्याच अनुषंगाने६जानेवारी२०२५रोजी महाराष्ट्रातील६०संपादकांना जनजागृती सेवा संस्थेच्यावतीने सन्मानपत्र व संस्थेचा कार्य अहवाल स्पीड पोष्टने पाठवून सन्मान केला.पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ,हा स्तंभ मजबूत करण्यासाठी पत्रकार क्षेत्रातील व साहित्य सर्वांचाच हातभार लाग-लेला असतो.म्हणूनच संस्थेने लेखक,क वी,साहित्यिक,संपादक,स्तंभ लेखक,मुक्त पत्रकार,वृत्तपत्र लेखक,पत्रकार यांना ऑनलाईन पध्दतीनेआकर्षक सन्मानपत्रपाठवून त्यांचाही सन्मान केला.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे खजिनदार दत्ता कडुलकर यांनी विशेष परिश्रम घे-तले.शेवटी पत्रकार क्षेत्रातील सर्व मान्यवरांचे जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी अभिनंदन केले.

पत्रकार सम्मान
जनजागृती सेवा संस्था
नोंदणी क्र.: ठाणे/0000509/2023

# महाराष्ट्र राज्य कलाध्यापक महामंडळ, पुणे संघाचे ४३ वे अधिवेशन शहादा येथे

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**शहादा –** महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळ पुणे व नंदुरबार जिल्हा कलाध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही कलाशिक्षक परिषद दि ११ व १२ जानेवारी २०२५ मीरा प्रताप लॉन्स शहादा येथे संपन्न होत आहे.

या परिषदेचे उद्घाटन राज्याचे शालेय शिक्षणमंत्री ना. दादास-हेब भुसे यांच्या हस्ते होणार आहे. राज्याध्यक्ष नरेंद्र बराई सर हे अध्यक्षपदी राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे राज्य शिष्टाचार व पनन मंत्री जयकुमार रावल, पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, शिक्षक आमदार किशोरजी दराडे पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजित तांबे, शिक्षक आमदार दत्तात्रेय सावंत, राजेंद्रजी भोसले तसेच खानदेश चे कलाप्रेमी तसेच इत्यादींसह मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या परिषदेत कलेचा शिक्षणात महत्त्व, विद्यार्थ्यांना उपयुक्त असे संगीत, नाट्य ,नृत्य ,गायन, वादन याविषयी तज्ञांचे मार्गदर्शन लाभणार असुन कला विषयावर विविध कलांचे प्रदर्शन होणार आहे जे विद्यार्थ्यांना शिक्षणात उपयुक्त असणार आहे. यावेळी राज्यातील कलाशिक्षक सदर कला परिषदेत सहभागी होणार आहेत .राज्य प्रसिद्ध प्रमुख श्री राजेंद्र भोसले सर.

# जन गण मन इंग्लिश (कॉन्व्हेन्ट) शाळेमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन व मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**दै. आवाज वृत्तसेवा...**



**नागपूर/प्रतिनिधी –** महाराष्ट्राची उप राजधानी नागपूर येथील दावसा येथील जे एम एफ शिक्षण संस्था अंतर्गत जन गण मन कॉन्व्हेन्ट शाळा येथे दरवर्षी प्रमाणेच मुलांच्या सुप्त गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी या वर्षी देखील वार्षिक स्नेह संमेलन आयोजित करण्यात आले होते. सकाळी अकरा ते तीन च्या सत्रात शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या अंतर्भूत असलेल्या कलेची चुणूक दाखवून सर्व उपस्थित पालकांचे, पाहुण्यांचे मन जिंकले.

जे एम एफ संस्थेचे संस्थापक सर्वेसर्वा माननीय डॉ राजकुमार कोल्हे, सचिव डॉ प्रेरणा कोल्हे , खजिनदार जान्हवी कोल्हे, नागपूर शाळेतील निवृत्त मुख्याध्यापक श्री.परशुराम जी भांगे ,त्यांच्या सुविद्य पत्नी सौ पुष्पा भांगे , दावासा गावचे प्रतिष्ठित डॉक्टर व डॉ.राजकुमार कोल्हे यांचे पिताजी डॉ मारोत राव कोल्हे , व्यवस्थापक श्री महेश कळंबे , मुख्याध्यापक श्री भजन सर ,तसेच मुंबई मधील शाळा महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.आमोद वैद्य, श्री. अल्पेष खोब्रागडे सर्व शिक्षक व इतर पदाधिकारी यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले.सर्व मान्यवरांचे नैसर्गिक पान फुलांनी तयार केलेले पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले तर विद्यार्थ्यांनी स्वागत गीत गायन केले. संवादिनी साथ मुंबईच्या संगीत शिक्षिका सौ श्रेया कुलकर्णी यांनी केली. सर्व लहान मुलांचे नृत्य बघुन डॉ राजकुमार कोल्हे यांनी मुलांचे खूप कौतुक केले.मुंबई ही मायानगरी आहे, अनेक जण स्वप्न उराशी बाळगून त्या मायानगरीत प्रवेश करतात, परंतु त्या स्वप्नाची नाळ ही आपल्या मातीशी जु-ळलेली असते , त्यासाठी इथे तुम्ही अपार कष्ट करा, अभ्यास करा, आणि आपल्या शाळेचे ,गावाचे नाव उज्वल करून मुंबई सारख्या महानगरी , मायानगरीत पुन्हा पंख पसरून यशाची आनंदाची चव चाखा असे संस्थेचे संस्थापक माननीय डॉ राजकुमार कोल्हे यांनी मुलांना सांगितले. बालवयामधे आपल्या स्वप्नांना आकार नसतो, क्षणाक्षणाला आपली स्वप्-ने बदललेली असतात, त्याच स्वप्नांना आकार देण्याचे काम हे आपले शिक्षक करत असतात, आज सर्वांनी खूप छान नृत्य, गायन, नाटकाचे सादरीकरण केले यामधील प्रत्येकजण कोणत्याही कला विश्वात आपले नाव उज्वल करू शकतो, तर आज आम्ही सुध्दा हे वार्षिक स्नेह संमेलन बघत असताना आमच्या बालवयात जाऊन रमलो आणि आनंद घेतला असे सचिव डॉ प्रेरणा कोल्हे यांनी व्यक्त केले.खजिनदार व दिग्दर्शिका जान्हवी कोल्हे यांनी भविष्या मध्ये दवासा या गावी एखादा सिनेमा दिग्दर्शित करून सर्व मुलांना त्या सिनेमात काम करण्याची संधी देऊ करणार अशी ग्वाही सर्व मुलांना दिली ते सर्व मुलांनी आनंदाने जल्लोष केला.

सर्व मुलांना प्रोत्साहनपर बक्षीस वाटप करून शाबासकी दिली.सूत्रसंचालन मयुरी जराहे व विद्यार्थ्यांनी केले तर सर्व शिक्षकांनी उत्तम आयोजन केले.

सामाजिक जबाबदारी आणि कर्तव्य या भावनेतून डॉ राजकुमार कोल्हे आणि डॉ प्रेरणा कोल्हे यांनी यावर्षी देखील जन गण मन कॉन्व्हेन्ट शाळेच्या प्रांगणात मोफत आरोग्य तपासणी शिबिर व मोफत औषध वाटप आयोजित केले होते .नेत्र तपासणी, रक्तदाब, मधुमेह या सारख्या अनेक शारीरिक आजारांचे तज्ञ डॉक्टरांचे पथक या शिबिरात सहभागी झाले होते. जवळपास दोन हजार दावसा रहिवाशांनी या शिबिराचा लाभ घेतला.डॉ महात्मे यांनी नेत्र शस्त्रक्रिया करण्यासाठी ५६ रुग्णांना दिनांक २ जानेवारी २०२५ ची तारीख दिली. परमपूज्य नायर गुरुजी चेतना परिवार नागपूर १० तज्ञ डाक्टर व २० च्या वर मदतनीस ने देखील हातभार लावून सामाजिक जबाबदारी पार पाडली. सर्व दावसां व २५ गांवच्या ग्रामीण रहिवाशांची उत्तम भोजनाची व्यवस्था करून त्यांना ब्लॅंकेट, थाली, दुपट्टा वाटप करण्यात आले.

# कलाकार संकेत नेवकर यांनी केली भारुड मधून जनजागृती

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**काचुर्ली/प्रतिनिधी–:** सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम क्रांतिवीर वसंतराव नाईक महाविद्यालय च कॅम्प तळेगाव गाव काचुर्ली येथे आयोजित करण्यात आला होता या सात दिवसाच्या कॅम्प मध्ये अनेक सामजिक विषय वरती चर्चा सत्र आयोजित केले आहे पहिल्या पुष्प मध्ये एकपात्री कलाकार संकेत नेवकर यांनी भारुड च माध्यमातून जनजागृती केली



भाषण कसे करावे या विषयावर मार्गदर्शन केले यावेळी प्रा चव्हाण सर यांनी प्रास्तविक केले विद्यार्थी प्रतिनिधी यांनी आभार व्यक्त केले यावेळी प्रा चव्हाण सर कार्यक्रम अधिकारी शेख सर, प्राध्यापिका भामरे मॅडम रा से यो स्वयंसेवक उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टॅंड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद (८९९९२९९९४). या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ – ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# विजय गोडसे आमचे गावचं भुषण - अशोक माने यांचे प्रतिपादन

## विजय गोडसे यांचा सेवापूर्ती सोहळा




**दै. आवाज वृत्तसेवा...**
**नाशिक** – जिल्ह्यातील ग्रामीण भागातून येऊन तिर्थक्षेत्र, तपोभुमी संतभुमी, यंत्रभुमी असणाऱ्या नाशिक नगरीत सिएट सारख्या जागतिक किर्ती असलेल्या नामवंत कंपनीत नोकरीची संधी मिळाल्याने विजय गोडसे यांचे आयुष्याला खऱ्या अर्थाने गती मिळाली, आज त्यांनी उत्तुंग भरारी घेत गगनाला गवसनी घालून परिवाराची शिक्षण आर्थिक क्षेत्रात भरभराट व प्रगती झालेली पाहायला मिळते, राजाचे खुर्दे ता.माण ही त्यांची जन्मभूमी आहे.परंतू ते कधीच आपल्या मायभुमीला विसरले नाही. गांवी आल्यावर मंदिर बांधकामासाठी,समाहासाठी देणगी नेहमी देत असतात.त्यामुळे संपुर्ण गावाला परिसराला व अशोकनगर पंचक्रोशीत विजय गोडसे हे आपला हक्काचा जीवलग माणुस वाटतो. त्यांना भरपूर आयुष्य मिळो.त्यांचे हातून अशीच यापुढे समाजाची देवाची सेवा घडत राहो अर्थात श्री विजय गोडसे आमचे गावच भुषण व एक आदर्श व्यक्तीमत्‌आहे असे भाव-ेद्गार अशोकराव माने यांनी नाशिक येथे त्र्यंबकरोडव हॉटेल वृंदावन गार्डन ला शुभेच्छा देताना श्री विजय गोडसे यांचे वाढदिवसा निमित्त काढले. सेवानिवृत्ती निमित्त नुकताच श्री गोडसे परिवाराने आयोजित केलेल्या समारंभात माने बोलत होते. यावेळी विजय माने, अण्णा माने, राहुल माने (उपसरपंच), अनिल माने (सभापती), अशोक चव्हाण, सुनील माने, पांडुरंग माने, हिंदुराव माने, महेंद्र माने, राजेंद्र माने, संभाजी पावशे, संदीप गुरव, कुमार जाधव, मोहिनी गोडसे, दिलीप गोडसे, अरुणा गोडसे, सिएट कर्मचारी अशोकनगर मित्रपरिवार, आप्तेष्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समाजात संविधानिक मूल्य वृध्दींगत होण्यासाठी पत्रकारिता महत्वाची भूमिका बजावते - जेष्ठ पत्रकार बळवंतराव आव्हाड



**दै. आवाज वृत्तसेवा...**
**नाशिकरोड** – नांदगाव तालुका मराठी पत्रकार संस्थेच्या वतीने मंगळवार दि. ७ रोजी नांदगांव येथील शिवनेरी शासकीय विश्रामगृह येथील सभागृहात पत्रकार दिनाचे औचित्य साधून पत्रकारांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.प्रमुख अतिथींचा सत्कार झाल्यानंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ठ पत्रकार तथा कामगार नेते बळवंतराव आव्हाड यांनी मार्गदर्शन करताना पत्रकारितेसमोर काळानूरूप येणाऱ्या संभाव्य आव्हानांची माहिती स्पष्ट केली.भारतीय घटनेच्या मूलभूत हक्कांसह कर्तव्यांची रुजवणूक समाजात करणे आवश्यक असून पत्रकारांनी पत्रकारिता करताना संविधानिक बाबींचा सखोल अभ्यास करावा. न्याय्य हक्कांसाठी समानतेच्या तत्त्वांचा अंगीकार करून दोन घटकांविषयीची बाजू स्पष्ट मांडावी. तसेच महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा या संदेशाला लक्षात ठेऊन पत्रकारांनी काम करावे अशी भावना आव्हाड यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आझाद आव्हाड यांनी केले तसेच ज्येष्ठ पत्रकार सुरेश शेळके, विजय चोपडा, राजेंद्र तळेकर, संतोष कांदे, सचिन बैरागी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

पत्रकार हेमराज वाघ व सिताराम पिंगळे यांनी सूत्रसंचालन केले तर आभार प्रदर्शन तालुकाध्यक्ष भरत पारख यांनी केले. या कार्यक्रम प्रसंगी नांदगाव तालुका मराठी पत्रकार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष महेंद्र पगार यांच्यासह तालुका शहरी व ग्रामीण भागातील पत्रकार आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# G-Champ अबॅकस नॅशनल लेव्हल अबॅकस स्पर्धेत सिन्नर च्या विद्यार्थ्यांचे सुयश




**दै. आवाज वृत्तसेवा...**
**नाशिक** – जी चॅम्प अबॅकस द्वारे ५ जानेवारी २०२५ रोजी घेण्यात आलेल्या आंतराष्ट्रीय स्पर्धेत नाशिक येथील साईमाऊली जी-चॅम्प अबॅकस सिन्नर च्या शाखेच्या - विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. नॅशनल अबॅकस ची आंतराष्ट्रीय स्पर्धा ५ जानेवारी २०२५ रोजी संत जनार्दन स्वामी आश्रम तपोवन नाशिक येथे घेण्यात आली होती. त्या स्पर्धेमध्ये श्री. किरण पवार सर व सौ. जयश्री पवार मॅम यांच्या साईमाऊली जी-चॅम्प क्लास च्या एकूण ५२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. त्यापैकी वैष्णवी सागर सुपेकर, ईशान स्वप्नील बारहाते, जानवी राजेंद्र चव्हाण, श्रुती उत्तम पडवळ, वेदांत किरण पवार, आर्यन संदीप शिसोदे व प्रेम प्रदीप घोडेराव ह्या सात विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनतीच्या जोरावर अवघ्या सात मिनिटात १०० पैकी १०० गुण घेऊन 'जी-चॅम्प सुपरस्टार ' चे मानकरी ठरले. तसेच आर्यन भगवान सानप, तनिष्का श्रीराम टेकाडे, किर्ती गणेश ठाकरे, साई सचिन चव्हाण, सायली रामरतन जाधव, आरुषी संतोष कांदळकर, कार्तिकी राजीव वेळजाळे ह्या सात विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक मिळवून आपली गुणवत्ता दाखविली. तसेच शिवांश सुरेश केकान, यश नितीन मुटकुळे, वेदिका अनंत जगझाप या तीन विद्यार्थ्यांनी दुतीय क्रमांक पटकवला. त्याच बरोबर काही फरकाणे वेदांशी महेश देवकर, श्लोक सचिन साळुंखे, विहान कृष्णा शेलार, आर्यन गणेश जाधव, तेजस गणेश पोल, या पाच विद्यार्थ्यांनी तुतीय क्रमांक मिळवीला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना जी-चॅम्प अबॅकसचे संचालक योगेश देशमाने व आरती देशमाने यांच्या हस्ते ट्रॉफी, मेडल व सर्टफिकेट देऊन गौरविण्यात आले. त्याच बरोबर सौ.जयश्री किरण पवार यांना २०२५ चा बेस्ट टीचर अवार्ड देखील मिळाला. व सर्व फ्रँचीसी मधून बेस्ट फ्रँचीसी आवर्ड व सन्मानपत्र देखील श्री. किरण पवार यांना जी चॅम्प- चे संचालक योगेश देशमाने व आरती देशमाने यांच्या हस्ते प्रदान करून गौरविण्यात आले. याची चर्चा संपूर्ण जी-चॅम्प मध्ये होत आहे. मुलांमधील एकाग्रता, बौध्दिक विकास आणि आत्मविश्वास वाढविण्यासाठी जी चॅम्प अबॅकसचे अभ्यासक्रम उपयुक्त आहेत, असे मत साईमाऊली जी-चॅम्प चे संचालक श्री. किरण पवार यांनी केले. आणखी महत्वाचे म्हणजे यात अजून देखील विद्यार्थी सहभागी होऊन काही प्रमाणात फरकाणे चॅम्पियन झाले त्यांची नावे अनुक्रमे. आयुष कामात, आराध्या निकम, वेदांत निकम, समृद्धी पाटील, संकेत तंती, रुद्रा वाघ, आरव जाधव, आरव सिंग, वेदिका आहेर, अर्जुन आव्हाड, दिव्या देवरे, राज गायकवाड, यश गायकवाड, आयुष हावळे, प्रणाली जाधव, आदेश लवांड, संस्कार लवांड, सिद्देश लोंढे, सौरभ मौर्या, अंश मिश्रा, हर्षद पाटील, श्रीकांत पाटील, प्रणव राठोड, काव्या सिंग, सागर तंती, हितेश कापुरे, तन्मय ठाकरे,समर्थ पाटील, प्रणित रौंदळे, साहिल गावित या विद्यार्थ्यांना देखील ट्रॉफी, मेडल व सर्टफिकेट देऊन गौरविण्यात आले.

# जेऊर कुंभारी परिसरातील रस्ते दुरुस्तीसाठी खा.भाऊसाहेब वाकचौरे यांना निवेदन!!- सरपंच सुवर्णा पवार

**दै. आवाज वृत्तसेवा...**
**जेऊर कुंभारी** – राजकीय दृष्ट्या महत्वाच्या जेऊर कुंभारी गांव व परिसरातील रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. त्यामुळे नागरिक त्रस्त आहेत. त्यामुळे गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी थेट खा.भाऊसाहेब वाकचौरे यांचे कार्यालय गाठत त्यांना रस्ते दुरुस्तीचे निवेदन दिले. गांव विकासामध्ये रस्ते महत्वाची भूमिका बजावत असतात. दळणवळण व्यवस्थित चालले तरच गावाचा विकास होतो. मात्र कोपरगाव तालुक्यातील राजकीय दृष्ट्या महत्वाच्या जेऊर कुंभारी गावातील रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाली आहे.



त्यामुळे गांव विकासाला अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे गांव व परिसरातील रस्त्यांचे नूतनीकरण करण्यात येऊन गांव विकासातील अडथळा दूर करण्यात यावा यासाठी मंगळवार दि.८ जानेवारी रोजी सरपंच सुवर्णा पवार ,माजी सभापती शिवाजीराव वक्ते ,संचालक बाळासाहेब वक्ते, माजी उपसरपंच जालिंदर चव्हाण, संजय वक्ते यांनी थेट खा.भाऊसाहेब वाकचौरे यांचे शिर्डी येथील कार्यालय गाठत रस्ते दुरुस्ती संदर्भात निवेदन दिले. निवेदनात सावळीविहिर शिवरस्ता ते हरिसन ब्रँच शाळा, पांडुरंग वस्ती हे रस्ते दुरुस्त करण्यात यावेत. हे रस्ते शिर्डी व कोपरगाव यांना जोडलेले आहे तसेच दळणवळणाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे. या रस्त्याने शेतकरी वर्ग आपल्या शेतात जात असतात तसेच शाळकरी विद्यार्थ्यांची स्कूल बस, जड वाहने या रस्त्याने जाण्यास अडथळे निर्माण होत आहे तेव्हा या रस्त्यांची दुरुस्ती करावी अशी मागणी सरपंच सुवर्णा पवार यांनी आली आहे.

# इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय मार्गदर्शनाचे आयोजन



**दै. आवाज वृत्तसेवा...**
**न्यायडोंगरी** – दिनांक ७ जानेवारी २०२५ रोजी लोकनेते कै.अॅड. विजय शिवराम आहेर हायस्कूल व जुनिअर कॉलेज नायडोंगरी विद्यालयातील इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना व्यवसाय मार्गदर्शन कार्यक्रमाअंतर्गत नवोदयन अकॅडमी चाळीसगाव यांच्या मार्फत वर्धा येथील प्रेरणादायी वक्ते सुमित ऊरकुडकर (कार्पोरेट ट्रेनर,सॉफ्ट स्किल ट्रेनर,करीयर काऊंसलर) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.यात विद्यार्थ्यांना अभ्यासाचे नियोजन,उज्वल भविष्याच्या दृष्टीने विविध शाखांची निवड,विद्यालयीन शिस्त अश्या अनेक विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

मान्यवर सुमित ऊरकुडकर आणि नवोदयन कडमी चाळीसगाव येथील अमित वाजपेयी यांचा सत्कार विद्यालया तर्फे प्राचार्या सौ.पी.व्ही. आहेर,उपमुख्याध्यापिका सौ.आर.ए.सोनगीरे, पर्यवेक्षक टी. ई.मवाळ यांनी केला.

यावेळी उपस्थित विद्यालयाच्या प्राचार्या सौ.पी.व्ही.आहेर, उपमुख्याध्यापिका सौ.आर.ए.सोनगीरे, पर्यवेक्षक टी.ई.मवाळ शिक्षक, शिक्षिका आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# एस.एन.डी. इंग्लिश मीडियमच्या ६ विद्यार्थ्यांचे राज्यस्तरीय चॅम्पियनशिपमध्ये यश

**दै. आवाज वृत्तसेवा...**
**लक्ष्मण घुगे, राजापूर-:**
बाभूळगाव येथील एस.एन.डी. इंग्लिश मीडियम पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेजच्या सहा विद्यार्थ्यांनी हाफ किडो बॉक्सिंग या राज्यस्तरीय चॅम्पियनशिपमध्ये यश मिळवले आहे. १४ वर्षे वयोगटाखालील हाफ किडो बॉक्सिंग या राज्यस्तरीय चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये सोलापूर येथे सहभाग नोंदीला होता.यातील सहा विद्यार्थ्यांपैकी तीन विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक व दोन विद्यार्थ्यांनी रौप्य पदक व एका विद्यार्थ्याने कास्यपदक प्राप्त केले.यामध्ये प्रामुख्याने मयूर भामरे,हिमांशू पाटील,यश वाबळे या विद्यार्थ्यांनी सुवर्णपदके प्राप्त केली.तर रुपेश देसले,कुणाल बर्डे या दोन विद्यार्थ्यांनी रौप्य पदके प्राप्त केली.व यश चव्हाण या विद्यार्थ्याने कास्यपदक मिळवत या संपादन केले. या स्पर्धेसाठी शाळेचे क्रीडा शिक्षक श्री.भांबरे व सागर मुटेकर यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले.या यशाबद्दल संस्थेचे कार्यकारी संचालक रुपेश दराडे,प्रशासकीय अधिकारी समाधान झाल्टे,सहायक अधिकारी सुनील पवार,शाळेचे प्राचार्य निलेश शिंदे,उपप्राचार्य संदीप पाटील आदींनी त्यांचे अभिनंदन केले.



# नॅशनल कराटे स्पर्धेत डी पॉल स्कुलच्या विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल



**दै. आवाज वृत्तसेवा...**
**लक्ष्मण घुगे, राजापूर** -: राजस्थान येथील अलवार येथे नॅशनल कराटे चॅम्पियनशिप स्पर्धा पार पडल्या असुन सदर स्पर्धेत येवला शहरातील डी पॉल स्कुलच्या विद्यार्थ्यांनी मोठे यश संपादन केले आहे. या नॅशनल स्पर्धेसाठी एकूण २१ राज्यातील संघ व ६५० स्पर्धक सहभागी झाले होते. यामध्ये शाळेमधील इयत्ता सातवीतील सोहम पवार आणि इयत्ता आठवीतील यश बिन्नर या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांकासह गोल्ड मेडल पटकावले. यसाठी त्यांना क्रीडाशिक्षक उज्वल पुराणिक, सचिन पांडागळे, गौरव सैंदाणे व यश्वनी गुप्ता यांचे मार्गदर्शन लाभले.मिळालेल्या यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक फादर मॅथ्यू आणि उपमुख्याध्यापक फादर ऑगस्तीन यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

दररोज वाचा दैनिक आवाज

# वेस शाळेत बाल आनंद मेळावा उत्साहात

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**कोपरगाव –** कोपरगाव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वेस या ठिकाणी बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वेस गावच्या सरपंच जयाताई माळी होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच आनंदा भडांगे तसेच ग्रामपंचायत सदस्य सिकंदर भाई इनामदार,मंगेश खंडीझोड होते,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अजीज शेख,सदस्य उत्तम खंडीझोड, शरद पवार,शकील सय्यद,विठ्ठल कुऱ्हाडे हेही उपस्थित होते. या बालआनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे भाज्यांचे फळांचे व शैक्षणिक खेळांचे दालने उभारले होती. गावातील सर्व ग्रामस्थ, पालक व विद्यार्थी यांनी या बाल



आनंद मेळाव्याचा मनमुराद आनंद घेतला.या मेळाव्यातून विद्यार्थ्यांचे व्यवहार कौशल्य यांचे दृढीकरण होताना दिसून आले. याप्रसंगी हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे कला वाणिज्य महाविद्यालय चे प्राचार्य श्री जावळे सर व प्राध्यापिका गांधीले मॅडम यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक अशोक शिरसाठ यांनी केले. कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य तसेच माता पालक व शिक्षक पालक संघाचे सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्ता खंडीझोड यांनी केले तर शिक्षिका वैशाली मोरे यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमासाठी शिक्षिका नलिनी साळवे, अलका रायभाने,कुंदना खंडीझोड, सविता गेठे पुनम खंडीझोड, सुनिता खंडीझोड रोहिणी आरणे, रीना पवार सोनाली भाले-राव, स्वाती खंडीझोड, तबस्सुम इनामदार,अश्विनी भालेराव, शैला खंडीझोड ग्रा. पं.सदस्या पूजा गायकवाड, तेरेजा खंडीझोड मनीषा खंडीझोड, भाग्यश्री शेळके,शितल पवार, कांता खंडीझोड, सुमय्या सय्यद दिपाली जडे,मयुरी कोल्हे,शोभा भडांगे,मंगल माळी, स्वप्नाली खंडीझोड,नीता खंडीझोड, उज्वला जैन,विद्या खंडीझोड यांनी कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घे-तले.

# श्री क्षेत्र टेरव येथे शाकांभरी नवरात्र प्रारंभ दिनी १०० भगिनींचे दुर्गा सप्तशती पाठ वाचन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**चिपळूण –** मंगळवार दिनांक ७ जानेवारी २०२५ रोजी शाकांभरी



नवरात्रीच्या पहिल्या दिवशी सकाळी सौ. विशाखा भिडे रत्नागिरी व सौ. शीला केतकर चिपळ-ूण यांच्या समूहाच्या १०० महिलां भगिनींनी दुर्गा सप्तशती पाठाचे वाचन करून मंदिर परिसर मंत्रमुग्ध केला.

दुर्गा सप्तशतीचा पाठ केल्याने मंदिर परिसरात वाता-वरण प्रसन्न होऊन माता जागृत होते व भक्तांस इच्छित फळ प्राप्त होते अशी भाविकांची श्रद्धा आहे. सदर प्रसंगी टेरव गावचे सुपुत्र मा. आमदार सन्माननीय श्री रमेशभाई कदम, ग्रामस्थ व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# ज्येष्ठ वृत्तपत्र लेखक अनंत आंगचेकर यांचा गौरव !



**दै. आवाज वृत्तसेवा...**

**विश्वनाथ पंडित, मुंबई/प्रतिनिधी-:** मराठी पत्रकार दिनानिमित्त जर्नालीस्ट युनियन ऑफ महाराष्ट्र वतीने ज्येष्ठ वृत्तपत्रलेखक, सामाजिक कार्यकर्ते अनंत आंगचेकर यांचा पत्रकारतेतील प्रदीर्घ कार्याबद्दल मिरा - भाईंदर -वसई पोलीस युनिट नं.१ चे डी. एस.पी.श्री. प्रकाश गायकवाड यांच्या हस्ते शाल, स्मृती चिन्ह व पुष्पगुच्छ देऊन एका सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून सत्कार करण्यात आला. यावेळी समारंभाचे अध्यक्ष पत्रकार प्रा. हेमंत सामंत यांनी आंगचेकर यांच्या सहा दशकातील प्रदीर्घ सामाजिक व पत्रकारितेतील कार्याची माहिती व महती सांगून आंग़चेकर यांच्या कार्याचा गौरव केला.

# व्यंकटेश मोरे यांची निवड

**दै. आवाज वृत्तसेवा...**



**नाशिक/प्रतिनिधी-:** व्यंकटेश मोरे यांची सेवा शक्ती संघर्ष एस टी कर्मचारी संघाच्या नाशिक विभागाच्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल त्यांचे सरचिटणीस सतीश मेटकरी, हेमंतअण्णा शेट्टी, विभागीय अध्यक्ष राजाभाऊ पाठक आदींनी स्वागत केले आहे.

## गोदावरी कालव्यातून..

(पान १ वरून) मंत्री श्री.विखे पाटील म्हणाले, शिर्डी नगरपालिकेच्या वाया जाणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पाणी चारी क्र.११, १२ व १३ मध्ये सोडण्यात येणार आहे. त्यामुळे येथील शेतकऱ्यांना बारामाही पाणी मिळणार आहे. पिंपळवाडी चारी क्र. १४ स्वतंत्र पाइपलाइन करण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याचे त्यांनी सांगितले.

जलसंपदा विभागाकडून शेतकऱ्यांना असलेल्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

यावेळी खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार आशुतोष काळे, विवेक कोल्हे यांचीही भाषणे झाली.

# माजी सरपंच धोंडिबा उर्फ धोंडीभाऊ डोंगरे यांचे निधन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**नांदगाव –** क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण संस्था नाशिक संचलित, एकलहरे थर्मल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे माजी प्राचार्य व वेहे-ळगाव ग्रामपंचायत चे माजी सरपंच धोंडीबा (धोंडिभाऊ ) भागोजी डोंगरे वय ७५ यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांनी राजापूर, वे-हेळगाव, नाशिक येथे नोकरी केली. त्यांनी मोठा मित्रवर्ग मिळवला होता. नांदगाव येथील कृष्णाई क्लिनिकच्या संचालक डॉक्टर अर्चना डोंगरे - नाईक, सविता डोंगरे- घुगे व मातोश्री कॉलेज प्राध्यापिका प्रियंका डोंगरे- इप्पर यांचे ते वडील होते. वेहेळगावचे



माजी सरपंच रामभाऊ डोंगरे आणि एसटी महामंडळाचे वाहतूक नियंत्रण अण्णा डोंगरे व नाशिक येथील माजी सब रजिस्टर रमाकांत डोंगरे यांचे ते मोठे बंधू होते. पळाशी येथील पत्रकार संजय दामोदर ताडगे सर व पत्रकार यशवंतराव दामोदर ताडगे सर यांचे ते मावसभाऊ होते व क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक संस्थेचे संचालक त्रंबक डोंगरे यांचे ते चुलत भाऊ होते.टाटा कंपनी चे मॅनेजर भास्कर डोंगरे ,नांदगाव आगाराचे कर्मचारी हिराभाऊ डोंगरे, सामाजिक कार्यकर्ते मधू डोंगरे, शिक्षक नेते किरण डोंगरे, डॉक्टर योगेश डोंगरे, चाळीसगाव येथील विजवितरण कंपनी चे अभियंता सचिन डोंगरे व नाशिक येथील प्रसिद्ध कॉन्ट्रॅक्टर ऋतिक डोंगरे यांचे काका होते.सरत्यांच्या पश्चात तीन मुली, पुतणे, चुलत भाऊ असा मोठा परिवार आहे. त्यांच्या दुःखद निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# आईनंतर बहिणीने ती जागा भरुन काढली- विलास महाराज सांगळे

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**मखमलाबाद/प्रतिनिधी –** मनापासून भावावर प्रेम असण-ारे पात्र म्हणजे बहिण.येड्या बहिणीची माया।नातं जन्माच सांगते।। आईवडील गेल्यानंतर जेवढं दुःख त्यापेक्षा जास्त दुःख बहिण गेल्याच मला जाणवते. कारण आईची उणीव बहिणच भरुन काढते असे उद्गार अखिल भाविक वारकरी मंडळ नाशिक जिल्हा उपाध्यक्ष हभपश्री विलास महाराज सांगळे सिडको यांनी मखमलाबाद गंगापूर पाट वृदांवण कॉलनी येथे थोरली भगिनी कै.



सौ.सुशिला रामचंद्र आव्हाड यांना श्रद्धांजली अर्पण करताना काढले.कालपासुन अ.भा.वारकरी मंडळ जिल्हाध्यक्ष आण्णासाहेब महाराज आहेर हिसवळकर यांचे मुखारविंदातून आव्हाड निवासस्थ-ानी गरुड पुराण कथा सुरु झाली आहे. कै.सुशिला रामचंद्र आव्हाड वय ६५ यांचे नुकतेच निधन झाले.त्यांचे पाठीमागे पती रामचंद्र आव्हाड,दोन मुले सचिन आव्हाड व नितीन आव्हाड मुलगी सौ. मनिषा जावई भाऊसाहेब सानप दोन सुना सौ सिमा आव्हाड सौ निलम आव्हाड एक नातं चार नातु असा परिवार आहे.गरुडपुराण कथेची वेळ स.११ ते १२ या वेळेत संपन्न होत आहे, तरी पंचक्रोशीतील भाविक व आप्तेष्ट यांनी श्रवणाचा लाभ घ्यावा.असे आवाहन हभपश्री विलास महाराज सांगळे यांनी केले आहे.

**आजचे कार्यक्रम –**

अ.भा.वारकरी मंडळ नाशिक जिल्हाध्यक्षः हभपश्री आण्णासाहेब महाराज आहेर हिसवळकर यांचा आजचा नियोजित कार्यक्रम दि.८/१/२०२५ बुधवार दु.१० ते १२ कै.सुशिलाबाई रामचंद्र आव्हाड गंगापूर पाट वृंदावन हाईटस मखमलाबादरोड, गरुड पुराण

दु.१२ वा.महौकॉ सातपूर कै.शंकरराव वरंदळ मासिक पुण्यस्मरण. दु.२ ते ३ कै.हौशाबाई दामोदर दाते तळेगांव गरुड पुराण कथा. दुपारी ४ वाजता पंचाळे ता.सिन्नरकडे प्रयाण. रात्रौ ८ वा.नाशिकला आगमण

## नाराज ..

नाराज वरिष्ठ पुढारी
जरा समजूत काढा
फैलावू नये आजार
पाजा औषधीकाढा

ऐन उत्सव समारंभी
घालती बरोबर राडा
स्वच्छ कराल अंगण
तिथे फेके रोडा राडा

ठिसूळ करी साहित्य
पोखरे नाराजी किडा
विरजणघाले आनंदा
हाकला एकदा पिडा

सरळ करायचे दात
दुखण्यांआधी दाढा
दाखवू लागता दात
दंत वैद्या कडे धाडा

तेल मॉलिश वेळेवरी
कुरकुरत चावे जोडा
जुनीभुते शांतवावीत
मग नवी बंधने जोडा

अंतस्थकुरबूर घातक
मुळातूनि लावा छडा
अस्तनी सफाईकरुन
महा जंगी युध्दा छेडा

**आवाज वृत्तसेवा – हेमंत मुसरीफ, पुणे. मो. ९७३०३०६९९६**







